प्रत्यक्षच ! त्यांतही एकानें सांगितलें कीं, "बाई, ब्राम्हणास पूस. तो सांगेल." मग ब्राम्हणास एकांतीं विचारिलें. ब्राम्हणानें सांगितलें कीं, " बाई, हा मूल पृथ्वीपती होईल. त्यास दहा वर्षांचा होई तावत्काल फार संभाळावें. पुढें हा पृथ्वीस संभाळून तुला पृथ्वीपतीची आई म्हणवील." त्या दिवसा पासोन [ मामानें ] रानांत जावयाचें मना करून घरचे घोड्यांची देखरेख सांगितली. यानंतर मातोश्रीचा काळ सत्वरच झाला.

त्या दिवसांत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांजला सातारकर राजे यांनीं दौलतीची सोंप करून गिरासपणा[10] करूं लागले. प्रथम स्वारी गोदावरी* पर्यंत जाहली. ' गंगेस घोडे न्हाले[11] ' अशी म्हण आहे. नंतर पेशवे यांनीं पवार धनगर वगैरे अवघे मराठे मंडळी जमा करून गंगेपुढें चाल केली. त्यांत पांढरे[12] सरदार यांचे पथकांत[13] बारगळ यांणीं मल्हारजी होळकर याचे जिम्मेस पांच पंचवीस घोडे होते ते करून पांढरे यांचे पथकाबरोबर रवाना केले. चाकरीत तैनात कांहीं एक नाहीं. लुटींत जें ज्यास प्राप्त होईल तें त्याचें. हुकूम पेशवे मशारनिल्हे यांचा. अशा चालीनें नर्मदा दक्षणतीरपर्यंत स्वारी केली. ते पेंढारियाप्रमाणें दौडीच्या चालीनें दिल्लीपर्यंत गेले. पातशाई सलतन[14] मोठी, फौज आली गेली हें कोणाचे गांवींही नाहीं. दिल्लीचे आसपास पोंहचल्यावर एक्या महालचे खंडणीचा जाब ठरला. तेथें हारी[15] बिघडूं नये असा करार. त्यांत मल्हारजी होळकर यांनीं आपल्या स्वारांनिशीं हारी कापून आणून घोड्यापुढें टाकिली. याचा बोभाट पेशवे यांपर्यंत गेला. तेव्हां बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचे चिरंजीव बाजीराव हे जातीनीं हातांत काठी घेऊन ताकिदीस निघाले. तों पाहत पाहत मल्हारजी होळकर यांचे गोठांत घोड्यापुढें हारी पाहून एका बारगिरावर बाजीराव यांनीं काठी टाकिली. तों मल्हारजी होळकर राहुटीचे तोंडीं

---

९. " धनगरांची उपमा इतर निर्बुद्ध, निरक्षर पुरुषांस देतात; हे तर प्रत्यक्षच धनगर ! " असा अर्थ.

१०. गिरासपणा=लुटारूपणा.

* 'श्रीगोत्री' पाठभेद.

११. ' गंगेस घोडे न्हाले ' हें महासिद्धि-बोधक वाक्य राजारामाच्या धामधुमीच्या कारकीर्दीपासून प्रचारांत आलें असावें. कारण औरंगजेबाच्या फौजेचे सात कोट ओलांडून गंगथडींतील मुलुख मारणें ही गोष्ट त्यावेळीं सामान्य नव्हती. या कैफियतींत हें वाक्य बाळाजी विश्वनाथाच्या स्वारीस अनुलक्षून घातलें आहे. असो. थोड्याच वर्षांनीं पुढें आपल्या मुलाचे घोडे यमुनेंत व नातवाचे घोडे सिंधुनदांत न्हाले हें पहाण्यास बाळाजी राहिला नाहीं !

१२. ' पांढरे ' या बद्दल एका प्रतींत ' पेंढरी, पेंढारी ' असा पाठ आहे.

१३. पथक=सुमारें शभर स्वारांचें एक पथक.

१४. सलतनत=ताबा, राज्य.

१५. हारी=तयार झालेली शेतें. ' हरोफी घडूं नये ' असाही पाठ आहे. हरोफी=दांडगेपणा.

देवपुजा पाशीं छिटून उत्पन्न केला; हीं[३३] कोठीचा काळकूट कोणाचे पोटचा आहे सांग." तेव्हां भाऊ साहेब बोलले, "नानासाहेब धनी, आपण सरदार, शास्त्रार्थाच्या गोष्टी उभयतांसही बोलण्यास हिंगफाटकूं[३४] लागत नाहीं. परंतु माझे गळ्यांत संसाराचें लोहडणें घातलें, तेव्हां बाजारांतून डाळ पीठ आणून प्रसंग संपादावयाच्या पोटीं देणेदाराची कोचवण[३५] किती आहे याचा रफेदफे[३६] धणी अथवा आपण करून मला मोकळें करावें. म्हणजे मीही उभयतां पेक्षां गोड-बोलणीं बोलून उभयतांसही आवडमून घेईन. श्रीमंतांचे दौलतीस कर्ज होऊन दौलत कर्जभरीत झाल्यावर मग कर्ज बाहेर निघणें कळतच आहे. यास्तव धणी व तुम्हीं वडीलांचे हातचीं माणसें एकत्र जाहलां, हिशेब कितेबाचा संशय असल्यास कागदपत्र तयार आहेत, हिशेब पाहून मला मोकळें करावें." तेव्हां सुभेदार बोलले कीं, "तुझे आईवर तैलाख[३७] आहे, खरेंच सांग दौलतीस देणें किती?" तेव्हां मग भाऊसाहेब हांसून बोलले, "पाऊण कोट रुपये देणें आहे." "खरेंच कीं काय?" म्हणोन सुभेदारांनीं पुसिलें. तेव्हां भाऊ बोलले कीं, "बोललों यांत दहावीस हजार अधिक उणें." मग सुभेदार बोलले, "दौत लेखणी बंद आण." तत्क्षणीं आणविले, भाऊसाहेब यांस म्हणाले कीं "याद धर, तीस लक्ष आपले नांवें लिहिले. तीस लक्ष शिंदे यांचे नांवें लिहिले, बाकी काय राहिली?" म्हणून प्रश्न केला. भाऊसाहेब बोलले कीं, पंधरा लक्ष राहिले. "याची वर्गणी विंचुरकर वगैरे लहान मोठे सरदार यांचा मेळ करून देऊं किंवा तुम्ही करून घ्याल?" त्याचें उत्तर भाऊंनीं केलें कीं, "आम्ही करून घेऊं. परंतु साठ कधीं पटतील?" तत्क्षणीं बिवाजी नाईक, विष्णु महादेव यांस बोलावूं पाठवून घेऊन आले, पूर्व संकेत नसतां त्यांचे रूबरू[३९] विष्णु महादेव यांस सांगितलें कीं, "साठ लक्ष

---

३३. "हा कोठीचा काळ कुठे कोणाचे पोटचा आहे" असेंही होईल. पण वरील पाठच बरा दिसतो- या भेटीचा सर्वच प्रकार चमत्कारिक दिसतो. मल्हाररावाचा सर्व रोख भाऊंवर आहे हें उघड आहे. म्हणूनच "नाना हे 'धनगर' सबब मूढ, दादा हे 'भिक्षुक' म्हणून गैरवाकब; यांस हिशेब ठिशेब समजत नाहीं. हे मात्र शिरे शहाणे म्हणविणारे हे कोण? हे कोणाच्या पोटचे?" अशा भावाचा प्रश्न होळकरांनीं केला. पेशव्यांचा व होळकरांचा घरोबा फार, पेशवे तर त्यांस काका म्हणत असत, हें विश्रुत आहेच; तथापि पेशव्यांच्या मातोश्रीस वरील सवाल जरा जाडाभरडाच झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

३४. हिंगफटकूं=हिंग+फटकूं, सामान सुमान, पैसा, खजीना यांचा पुरवठा.

३५. कोचवण=तसदी, टोंचणी (?)

३६. रफादफा=रफातफा=फडशा.

३७. आईवर तलख, सात तलख, वगैरे वाईट शिव्या आहेत.

३८. गद्रे सावकार.

३९. रूबरू=समक्ष.

धन्या जवळ आपल्या सारिखे मुरब्बी[८०] त्यांचे निकट आमची गरीबी कायम राहून, वैगुण्याचा[८१] दोष न येतां त्रिवर्गाचे[८२] मनांत आमची गरीबी वागली म्हणजे लक्ष या गोष्टीस मिळोनें[८३] मुस्तकीम[८४] ठेऊन लोभ ठेवावा. श्रीमंतांचे पायांपाशीं राहिलों असतां आपल्यास अनकूळ तेंच घडेल. वायां जाणार नाहीं." असे भावीं बोलणें होऊन नारो गणेश याजला श्रीमंतांची आज्ञा देऊन बिदा केलें[८५].

इंदुरीं आल्यावर श्रीमती व सुभेदार यांची भेट घेऊन, झालें वर्तमान श्रवणारूढ करून शेवटीं हीं[८६] गोष्ट सांगितली. ऐकोन घेऊन [ बाईसाहेबांच्या ] चित्ताचा विक्षेप बहुत जाहला. " अद्यापिही ही ग डी न वा फे[८७]ली इतकियांतच न पुसतां कारभार करूं लागले. उत्तम आहे. ज्या समयीं आम्हांवर वक्त कैलासवासी वडिलांनीं माणसें करून ठेवलीं होतीं त्यांनीं तर खटलीं पीं-हिलीं. तुम्हीं आमचे ममतेंतील खामगीचे कारकून परंतु गुणदोष तुम्हांस समजले असतां आपले बचावास्तव मनचेमनांत ठेवून राहिलां. त समयीं शिवबा बाजी व राजाराम यांनीं जीव झोंकून[९०] बुद्धिवाद सांगितलें[९१]. त्याजवर हा दिवस ईश्वरें दाखवून तुम्हांस संस्थान प्राप्त जालें. या गोष्टी तुम्हांस ठाऊक असतां मनोभंगास आमचे आज्ञेचाही आक्षेप घेण्याचाही संकोच पडला[९२] नाहीं. याजवरून पुढें तुमचे हातून दौलतींतील माणसें वोळखून आपसांत किलाफ न वाढवितां दौलतीचा जळूंष[९३] राखाल यांतील निदर्शन या करण्यांतच ध्यानास आलें." अशा भावीं दोष पदरीं घालून मनांत मशारनिल्हेविशीं किलाफाचें[९४] बीजारोपण जहालें.

---

८० मुरब्बी=धुरंधर, कर्ते, हुषार.

८१. वैगुण्य=अपमान, दुर्लौकिक

८२ त्रिवर्ग=श्रीमंत, सुभेदार, व तुम्ही ( नाना ).

८३. ' मिलाज ' असें मूळांत दिसतें. ' मिज्याज ' पाठांतर.

८४. मुस्तकीम=कायम, स्थिर, ठाम.

८५. शिवबाबाजी—शिवाजी गोपाळ हा पारनेरकर रावजी महादेव फडणवीस यांच्या पदरचा. मागें पृष्ठ ३५ पहा. रावजी पारनेरकरांनीं माधवराव दादांच्या ताब्यांत असतां त्यांजवर उपकार केले होते, अशा कारणानें शिवबास आपले सन्निध ठेवून घेण्याचें माधवरावांस बरें वाटलें असावेंसें दिसतें. तथापि असें करण्याची इतकी जरूर कोणती ? खेरीज शिवबास भोजनार्थ बलाविलें असतां तो आपल्या हातें स्वयंपाक करतो तो कां ?

८६. ही गोष्ट=शिवबास काढून श्रीमंतांकडे ठेविल्याची

८७. ' गलीजवाफली ' पाठांतर.

८८. हें गंगोबा तात्यास उद्देशून म्हटलें आहे.

८९. गंगोबाचें कारस्थान तुम्हांस कळलें असतां असा अर्थ.

९० जीव झोंकून=जिवाकडे न पहातां

९१. मागें पृष्ठ ३५।३६ पहा.

९२. शिवबास काढावें ह्या बद्दल अमचा हुकूम घ्यावयाची देखील तुम्हांस भीड पडली नाहीं, परस्पर काढून लाविलें.

९३ जलूष=अंमल, जरब, आब.

९४. किलाफ=वांकडें, कलुषितपणा.

मारवाडांत रवाना करून बापू होळकरास पत्रें गेलीं कीं, तिकडील मसलत समारोप होऊन इस्मायलबेग हस्तगत जहाला. ते पक्षीं तुम्ही फौज पेंढारी याजसुद्धां काशीराव यास मारवाड प्रांतीं जाऊन सामल व्हावें. अशीं पत्रें रवाना जहालीं. काशीराव होळकर व शिंद्याकडील सरंजाम अजमेरीवर मुकाबल्यास दाखल जहाले. तों बापू होळकर यांसि पत्रें पोंचाऊन अंबोजी इंगळे यांसि पाटील बावांनीं हुजूर बलावलें. तेव्हां इस्मालबेग याजला घेऊन मथुरेस गेले. बापू होळकर फौज बमय पेंढारी बमय काशीराव होळकर याजपाशीं दाखल जहाले. मारवाड वाल्याचा मुकाबला घालून एक लढाई होऊन मारवाड वाल्यास हटवून मेडत्यावर नेऊन घातले. हें वर्तमान राजोंस[४१] समजून त्यांणीं आपले भाई बेटयांस बलावलें. तेव्हां तुम्हांकडून कांहींच बनून आलें नाहीं. मग राठोडाचे फौजेंत जाटाचे गणनीय माणसें होतीं. त्यांस वीरश्री पडून आठशें असामी रजपूत याणीं केशर्‍यों[४२] करून मरणोन्मुख जहाले[४३]. लढाईची तयारी शिंद्यांकडील फौज जरब खाऊन [ होती ] तथापि त्याणें नक्षा बांधून उभे राहिले. पुढें पलटणें. पलटणापुढें रणगाड्याचा जंजिरा[४४]. यापुढें तिकाऱ्याचें गोखरूं. असा जाबता तोफांचे गोळ्यांत करून कंपूचे एक[४६] एक बाजूस गोपाळराव व जिऊबादादा. होळकराची फौज त्यास गणनींत नाहीं. बापूराव व काशीराव अदकोसाचे पिछाडीनें उभे होते.[४६] तेव्हां राठोडांनीं घोडे कसे घातले आणउचा गाळींचा[४७] घेऊन उजवे हातीं हुका [!] डावे हातीं अनीन आणि चालीनें गेले. रणगाडे तरवारीनें तोडून तोफांवर तरवार चालविली. सर्फ कोठें हीं अक्षरें न बोलतां गेले. गोपाळरावजी व जिऊबादादा तीन कोस पराङ्मुख जहाले. तेव्हां इबई भयाभीत होऊन काशीराव व बापू होळकर उभे होते. त्यांजपाशीं येऊन टोपी आपटली. "बदनक्षा व नुकसान माझें होत नाहीं, सरदार आहां. चांगलें दिसेल तें करावें." मग बापूसाहेबांनीं बाळासाहेबांस ठिकाणीं

४१. राजा—बिजेसिंग.

४२. केशऱ्या करणें=केशरी पोशाख करणें, अगर केशराच्या गंधाचा पजा छातीवर लावून घेणें. हें मरूं किंवा मारूं या निश्चयाचें व्यंजक आहे.

४३. अहवा व असोपी येथील ठाकुरानीं चार हजार लोकांनिशीं नीट तोफखान्यावर चालून घेतलें. कर्नल टॉड.

४४. जंजिरा=जंजीर=साखळदंड.

४५. 'तिखाऱ्याचें' पाठांतर, तिखारा=तिखें.

४६. "एक एक बाजूस गोपाळराव होळकराचे फौजचे त्यांत गणनींत नाहीं व बापू व काशीराव अद कोसाचे पिछाडीनें उभे होते" असें मूळांत आहे. उपलब्ध असलेल्या दोन्ही प्रतींच्या लिहिणारांस मूळ प्रतीचा अर्थ न कळल्यामुळें त्यांनीं अशुद्ध फार लिहिलें आहे त्याचा मासला वर दिला आहे. असो—अशामुळें अर्थ निर्णय करून हें प्रकरण नीट शुद्ध करण्यास फार प्रयास पडतात. वरील वाक्य आम्ही पुढील संदर्भावरून शुद्ध करून घातलें आहे.

४७. वरील प्रकारचें हें दुसरें उदाहरण 'अणनीचा' तर नव्हे ?

राहिला. सबब चिंतो आत्माराम मुक्कामास गेले. म्हणून बक्षीचा निरोप त्यांशांस येतांच स्वारीही छबिन्याजवळ आली. रात्रीचा विषय सबब एक्या टेंकडीवर जाऊन त्यांसे तमाशा पाहण्यास बसले. तों मागून फुलण व मालणशिंगाकडील पलटणें येऊन पावलीं. मग शिंद्याचे फौजेच्या सुमारे मोर्चेबंदी आंगपाता कडे मीरखां वगैरे पठाणाकडील यांजला आज्ञा जाहली कीं, तिकडून मोर्चे बंदी करावी. रात्रौ त्यांशांचा व मिरखानाचा संकेत जाला होता कीं, दिवस उगवल्यावर तोफा सुरू करून हल्याचा विचार होईल तेसमयीं एक बाण इशाऱ्याचा सोडूं, म्हणजे तुम्हीं उठावणी करावी. मग दिवस उगवतांच तोफा सुरू करून पलटणाच्या बाजूस पागा हुजुरात व बक्षी, चिमणाजीपंत वगैरे होऊन तोफा दराबीवर धरून संकेताचा बाण सोडतांच आंगपाताचे दरवाजाकडून मीरखानाची उठावणी जाली. चहूंकडून फौजच फौज. तेव्हां शिंद्याचे लोक घाबरून गांवांत पळूं लागले. चिंतो आत्माराम कामास आले. लढाई खत्तम जाली. नंतर आठ पंधरा दिवस तेथेंच मुक्काम होता. *

या अवसरांत शिंदे यांनीं सरजेराव बापुखां वगैरे सतलज साहेब यांचा कंपू बरावर देऊन हंड्याचे घांटे चढून इंदूरचे सुमारें चाल केली. हें वर्तमान

---

* ग्रांटडफ साहेबांच्या ग्रंथांत दिलेली हकीकत थोडक्यांत खालीं देतों ती मागील व पुढील मजकुराशीं ताडून पहावी.

१. आनंदराव पंवार यांजकडे यशवंतरावास आश्रय मिळाला. पण शिंद्याच्या पत्रावरून पंवारांनीं थोडे घोडे स्वार व कांहीं पैका देऊन होळकराची बोळवणी केली.

२. नतर अमीरखान, ( ज्यास कैफीयतींत मीरखां म्हटलें आहे ) वगैरे मंडळी येऊन मिळाली.

३. काशीराव होळकर कमकुवत याकरितां खंडेराव होळकर याच्या नांवचा शिक्का करून यशवंतराव त्याचा मुकत्यार अशी व्यवस्था करून होळकराच्या घराण्याचे कैवारी असतील त्यांणीं एकत्र होऊन दौलत शिंद्या पासून होळकरी महाल परत हिसकावून घ्यावे व खंडेरावची सुटका करावी असें ठरतें. शिंद्यांचे महालांची लूट सुरू होते.

४. काशीरावानें दुंदरनेकास पाठविलें त्याचा पराभव केल्यानें यशवंतरावाचा लौकिक होतो—दुंदरनेकही त्यास मिळतो.

५. बायांचा तंटा. यशवंतराव त्यांस धरून देण्याचें कबूल करतो. बऱ्हाणपुरास बायांस वेढितो. बाया हिंदुस्थानांत पळतात. यशवंतरायाबद्दल शिंद्यांस वहिमा. शिंदे पुणें सोडून हिंदुस्थानांत जाण्यास निघतात.

६. होळकराची तयारी—हेसिंग साहेबांचीं पलटणें शिंद्यांकडून येतात. मिटायरचे हाताखालच्या टोळीचा होळकर नेमरी येथें नाश करतो.

७. जानेवारी १८०१ मध्यें हेसिंगशीं लढाई. सात युरोपियन ठार. ४ धरले. हेसिंग धरला. उज्जनीपासून खंडणी. होळकराची फत्ते.

८. जुलईंत ब्रौनिंग याच्या तोफखान्यावर यशवंतरावाचा हल्ला. त्यांत त्याचा पराभव व नाश फार होतो.

९. इंदुरची लढाई आक्टोबर. १४ सरजेराव घाटगे व सुदरलंड होळकराचा पराभव करतात.

पिस्तोलांची देवढ. दिल्ही. त्यांत सरकारी सरंजाम यांचे पाय उठले. ते समयीं महाराजांबरोबर हुजरात पैकीं शें पन्नास स्वार व ब्रह्मवृंद मंडळी इतक्यानिशीं अ मे ट चा रस्ता धरिला. फिरंग्यांनीं तीन कोस पिच्छा केला. येणे कडून पार पडले. मागें बायका देव जामदारखाना हत्तीचे निशाण अवघें त्यांनीं समेटलें. त्या प्रसंगीं मिराभाई यानें हत्तीचें निशाण आणलें. बायका काढून आणण्यांत सुलतानजी बाहड व हरिबा होळकर व सदरदीन हवालदाराचा जांवई व लालमण होळकराचा पुत्र हिरामण व दलसिंग कुंवर इतक्यांनीं घोडे घालून श्रीमंत सौ जिजीबाईसुद्धां काढून आणल्या. सदरदीनाच्या जांवयास जखम तोंडावर आली. परंतु बायका काढून आणल्या. बाकी अवघी दौलत गारद झाली.

सरकार निघून एकटेच चार घटका दम खाऊन अर्ध रात्रीचे समयीं गडगुच्याचे समीप दम खाल्ला. तेथें पलटणची माणसें गणपतराव दिवाण व विठ्ठल महादेव यांजला घेऊन आले. मग तेथून पुढें चालले. तों चर्मण्वती

१०. देवढ=एक सारखी सरबत्ती.

११. पाय उठले=ते पळूं लागले.

१२. ही महत्पूरची लढाई.

. डफ साहेबाच्या ग्रंथांतील हकीगत बखरींतील हकीकतीशीं ताडून पाहण्यासाठीं थोडक्यांत येथें देतों:—

( १ ) होळकराच्या दरबारांत २ तट—मराठ्यांचा व पठाणांचा.

( २ ) मराठी तटांत तुळशीबाई होती—त्यांणीं बाळाशेट यास मारविलें.

( ३ ) तात्या जोगाच्या हातीं सर्व अधिकार आला. गणपतराव दिवाण हा मनाचा दृढ नव्हता. पण तुळशीबाई त्याजवर फिदा होती.

( ४ ) बाजीरावाची खटपट या दरबारीं सुरू होतीच गणपतराव व तुळशीबाई यांणीं त्याचा पक्ष स्वीकारला. गव्हरनर जनरलाकडून बोलण्यास मेटकाफ साहेब आला होता. त्याकडे तात्या जोगाचा कल आहे असें पाहून त्यास कैद केलें.

( ५ ) पण पुनः तुळशीबाईनें तात्याच्या मार्फत इंग्रजांचा आश्रय मागितला. गणपतरावही कबूल झाला; परंतु ते सर्व पडले लष्करच्या ताब्यांत. तेव्हां तें त्यांचें कांहीं चालेना. आणि शेवटीं बाजीरावाचा पक्ष उचलण्याचा निश्चय त्यांणीं केला. रोशनबेगही त्यास महीदपुराच्या आलीकडे मिळाला. पठाण लोकांनीं सल्याचें बोलणें चालणें सुरू ठेविलें होतेंच पण त्यांच्या मनांत तह करण्याचें नव्हतेंच. कदाचित् दरबार तह करील असें वाटून त्यांणीं गणपतराव यास कैद केलें व तुळशीबाईचा जीव घेतला, व म्हैसुरच्या पागेवर चालून घेतलें.

( ६ ) ता० २० दिसेंबर १८१७ रोजीं जनरल हिस्लाप व मालकम यांणीं क्षिप्रा उतरून लढाई केली. होळकरास नदीचा आश्रय चांगला होता. नदी उतरून पलटणें पुनः उभीं राहतां राहतां त्यांची रोशनबेगच्या लोकांनीं फार नासाडी केली. इंग्रजांचे ७७८ लोक पडले. होळकराचे सुमारें ३००० पडले पण ते विशेषतः पळांत पडले. पण पळालेले लोकही मोठ्या व्यवस्थेनें परतले.

( ७ ) रोशनबेगचें पलटण रामपुऱ्यास गेलें. त्याचा ब्राऊनसाहेब यांणीं पराभव केला. रामदीन हा आपले लोकांसह बाजीरावास कोरेगांव येथें मिळाला.

# होळकरांच्या कैफियतीवर शुद्धिपत्रासहित अधिक टिप्पणें.

" होळकरांची कैफियत " या नांवाचें प्रकरण प्रसिद्ध झालें. त्यांत बहुत ठिकाणीं मूळ प्रतीची लिपी चांगलीशी नसल्यामुळें दुर्बोधता राहिली व कांहीं स्थलें संशयात्मक होतीं. अशा दुर्बोध, संशयात्मक शब्दांचा व शब्दसमूहांचा खुलासा आमचे इंदुरकर मित्र रा० बळवंत कमळाकर यांणीं बहुत परिश्रमपूर्वक व शोधपूर्वक करून आह्मांकडे पाठविला त्याबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहों. कांहीं ठिकाणीं अर्थ सुबोध आहे असें वाटल्यावरून आह्मी शब्दार्थाच्या टीपा दिल्या नव्हत्या, अशा ठिकाणींही टीपा बळवंतरावजींनीं दिल्या आहेत त्यामुळें त्या त्या स्थलांना विशदता अधिक येईल. असो. ही सर्व त्यांची कृति वाचकांस सादर करितों.

## शुद्धीकरण व अधिक टिप्पणें वगैरे.

| पृष्ठ. | ओळ. | |
|---|---|---|
| ४ | १ | दीलजमाई–समाधान, सांत्वन. |
| ,, | टीप २५ | "किस्सा" शब्दाचा मूळ अर्थ "गोष्ट, काम" इतकाच आहे. |
| ,, | टीप २७ | कथासंदर्भावरून तर " आवेशानें" असा ह्या शब्दाचा अर्थ असावासें वाटतें. |
| ,, | टीप ३१ | ' बडवणी ' या नांवाचें एक संस्थान रजपुतांचें नर्मदेच्या कांठीं नेमाडांत आहे. |
| ५ | टीप ३५ | कायल=निरुपाय. |
| ७ | १२ | जुवामर्दी–शौर्य, पुरुषार्थ. |
| ,, | टीप ५० | हमरा=हमराह=बरोबर, समवेत. |
| ,, | टीप ५१ | " अगला फत्ते बंदा हुषार " असेंच पाहिजे. |
| ८ | ८ | खातरतसलीम=खातरतसल्ली=विश्वासपूर्वक समाधान, आश्वासन. |
| ,, | २१ | सलतान=सलतनत=दौलत, फौज. |
| ,, | ,, | तहखाने–" तहखाना " ह्याचा अर्थ "तळघर" असा आहे. पण तो येथें लागू पडत नाहीं. |

| पृष्ठ. | ओळ. | |
|---|---|---|
| ,, | टीप ६३ | हमराहा=समवेत, बरोबर. |
| ९ | १ | गांवखुद=निर्मूल, अर्थात् स्वाधीन असा भाव. |
| ,, | १० | "श्रीमंतांचा" या शब्दा पुढचा स्वल्पविराम काढून "प्रताप" या शब्दापुढें घालावा. आणि "तरवारीचा" या शब्दापुढील स्वल्पविराम काढून "जळूस" या शब्दापुढें घालावा. जळूस=जलूष=उत्कर्ष, भरभराट. |
| ,, | १४ | रबाब–तेज, प्रभाव. |
| ,, | १९ | धुमा=धूम, लढाई, लुटालूट. |
| ११ | टीप ७१ | नाकार=निकामी, टाकाऊ. |
| ,, | १८ | ' धाग्के ' आहे तेथें ' धाकटे ' असें वाचावें. |
| १२ | टीप ८४ | मवसर=मवस्सर=प्राप्य, लभ्य. |
| १३ | टीप ९१ | कार=गोष्ट. |
| ,, | १७ | "कौलाचा" याजबद्दल "मौलाचा " असें असावें. मौल |

पृष्ठ. ओळ.

म्हणजे कपट, इंद्रजाल. मौलाचा बाजार व मीनाबाजार भरविण्याची पूर्वी चाल होती श्री० कै० जयाजीराव शिंदे हे मीनाबाजार भरवीत असत असें ऐकिवांत आहे. ह्या बाजारांत मालाची विक्री करण्यास बहुधा वेश्या किंवा स्त्रिया बसतात. व त्या मागतील तीच किंमत द्यावी लागते. व एकदां रकम मागितल्यावर घेतलीच पाहिजे असा नियम असतो. हा बाजार रात्रीं भरतो. ह्याचाच दुसरा प्रकार खोट्या रकमा किंवा कपटानें रकमेचें रूपांतर करून बहुत किंमतीची रकम थोड्या किंमतीस द्यावयाची तो " मौलाचा बाजार. "

११ १७ शहरत=सुराख ?=मजकूर.

,, टीप ११ तिर्पुल्या=त्रियोळ्या दरवाजा =तीन कमानींचा मोठा दरवाजा. बाजारास असे दरवाजे रजपूत लोकांच्या शहरांत फार करितात. असा रतलामेस हल्लीं आहे.

१४ ७ " माचीशहर " हें एका ठिकाणाचें नांव आहे.

,, १४ 'दिल्की' बद्दल 'दिल्ली' असावें.

,, १५ "फरकाबाद" कानपुराजवळ आहे.

,, टीप १७ निशा=खात्री, जामिनी.

१५ टीप १ कायल-जेर, जर्जर.

,, टीप ३ आलेलें अरिष्ट टळलें असतां त्यास " खैर " म्हणतात.

१६ टीप ११ 'कलावा' असेंच असावें. कलावा म्हणजे गराडा.

१६ २० "तलावा" बद्दल "कलावा" पाहिजे.

,, २१ गाफली=सुस्ती.

१७ ६ दर्जात=स्थितींत.

पृष्ठ. ओळ.

२२ टीप ४२ मेकसू-खुंट्या ठोकण्याकरितां लांकडाचा ठोकळा करितात तो.

२७ टीप ७९ बरदास्त=सहन.

,, टीप ८२ हवापाहून=प्रसंग पाहून.

२८ २ भरा-भरी-जमाव, गर्दी.

,, ७ भारबरदारी-सामान लादण्याची साधनें, गाड्या, उंट, घोडे, तट्टें, वगैरे.

,, २५ दामदस्त=दरोबस्त, सर्व.

२९ ४ " कोठांवाले " याबद्दल " कोटेवाले " असें वाचावें.

,, टीप १४ बाजबरसात=बादबरसात=पर्जन्यकालानंतर.

,, १३ मंदोसर हें शहर इंदुराचे उत्तरेस ५० कोसांवर आहे.

,, २३ " जमेस " याबद्दल " जिम्मेस " असावें.

३० टीप ९८ ' तन देईना '-( तन=शरीर ) झटून लढेना.

३० टीप १०० ' लांभाते ' हें उपनांव आहे.

,, टीप ४ फटकूं=तुरटी.

३१ २ गिरीफदारी=दुःख.

३२ १ दराबीवर धरून-तयार करून, सिद्धकरून. तोफेखालचा जो फळपैय्या ( stand ) त्यास दराब म्हणतात.

३२ टीप १२ पेटा=ताबा.

३३ १५ " सुरतसांभाळ्या " याबद्दल " सुरत सांभाळल्या " असें पाहिजे. सुरत सांभाळल्यापासून म्हणजे समजूं लागल्यापासून.

,, टीप * इलाजम=गुन्हा.

३५ टीप २८ गालब=गालिब-व्याप्त, आवृत.

३७ ४ " बदरून " बद्दल " दाखवून " तर नसेलना ?

,, ११ " गारद्यांखेडीस " बद्दल "गाडराखेडीस" असें असावें.

पृष्ठ. ओळ.

( गाडर+खेडी=गाडरखेडी. गाडर म्हणजे मेंढरें त्यांचें राहण्याचें गांव. हें इंदुरा जवळच आहे. )

३० ३४ अंकपात ह्या नांवाचा एक घाट उज्जनीस आहे.

,, २५।२६ दत्ताचे आखाड्यावर—हेंही स्थळ उज्जनींतच आहे.

,, टीप ३८ कस्त=परिश्रम.

३८ टीप ३९ अवसाफ=नष्टता, अभाव.

,, टीप ४० खुर्द-कमी किंवा लहान.

,, टीप ४१ मातंगपोशी=मातंपुरशीस= (मातं=दुःख. पुरशीस-विचारणें.)

३९ टीप ४५ जलूष=माहात्म्य, प्रभाव.

,, ११ "टिकावर्ख्रे" असा एक शब्द पाहिजे. टिकावर्ख्रे=राजतिलक होण्याच्या वेळचा आहेर.

,, टीप ४७ तराह खाणें=कानाडोळा करणें, दुर्लक्ष्य करणें.

४० १० "व" हा शब्द नको. काढून टाकावा.

,, १४ "पायावयास" याजबद्दल "पहावयास" असें असावें.

४१ ११-१२ पादभूषणादिक अलंकार—ही व्याजोक्ति आहे. वेड्या व हातकड्या असा अर्थ.

४२ टीप ६१ जलूष=प्रभाव, थाट.

४३ २३ 'तुह्मी' या शब्दापुढें पूर्णविराम नको. मलई म्हणजे दुधावरची साय, अर्थात् अधिकार-सार.

४५ १० कसांत घातलेला 'न' जरूर पाहिजे. मूळ बखरींत नाहीं ती नजरचूक होय.

,, टीप ७८ इतला=खबर असा अर्थ आहे.

४६ ९ "ही गडी नवाफेली" याबद्दल "हिंगली न वाफेली" असें पाहिजे. ह्याचा अर्थ अजून कशास कांहीं ठिकाण नाहीं.

पृष्ठ. ओळ.

,, १७ किलाफ=वाईट, वांकडें.

,, टीप ९३ जलूष=मोठेपणा, प्रभाव.

४८ २७ "बक्षीचा" याजबद्दल "बक्षीच" असें असावें.

४९ ४-५ "सारे दरवार [ मध्यें ] याजबद्दल "सरेदरबार" इतकें बस आहे. सरेदरबार=भरलेल्या दरबारांत.

,, १४ बसात=बसांत—ताब्यांत.

५० टीप ७ दूरंदेशी=दूरवर.

५१ १६ "खलत" याबद्दल "खिलत" असावें.

,, २५ उदया, उद्दी=वर्दी, ताकीद.

,, टीप १६ वादीष=सन्मान.

५२ १ दीलजमाई-आश्वासन.

,, २० इदमथ—"इदम्, अथ" भवतिनभवति या अर्थी तर नसेल ?

५३ २-३ "सला वदनेक" बद्दल "सुला बहुत नेक" असें असलें म्हणजे संबंध जुळतो. वदनेकानें जुळत नाहीं.

,, ५ बारायमसलत=बरायमसलत=मसलतीप्रमाणें, मसलतीस अनुसरून.

,, ९ असकच=अशक्यच.

,, १० या=अथवा.

,, १६ "लक्ष" ह्याबद्दल "नक्ष" असावेंसें वाटतें. नक्ष=इभ्रत.

५४ १ मूळ बखरींत "मु" नाहीं तो जरूर पाहिजे. मुकाबलीस=सामन्यास.

,, टीप २७ "वाजूं" असेंच असावें.

५६ १८ "अणउचागाळावा" याबद्दल "अफूचा गाळवा" असें पाहिजे. अफू पाण्यांत गाळून तें पाणी रजपूत लोक पितात त्यास कुसुंबा असें म्हणतात. हुक्का म्हणजे गुडगुडी.

५७ ३ "गोल" याबद्दल "गुल"

पृष्ठ. ओळ.

असेलसें वाटतें. गुलं ह्मणजे बैदा, दंगा.

५७ टीप ५२ खतम असें पाहिजे. खतम =समाप्त.

" २५ बिचोबा=दोन खांबाचा लहानसा डेरा.

" २८ " कच्छे " बद्दल "कच्छवे" असावें. जयपूरवाले रजपूत ह्या जातीचे होत.

५८ २३ " टाळे " बद्दल " टाळले" असें असावें.

" २७ रबाब=तेज, प्रभाव.

५९ १ गांवखुद=नाहींसे.

" १० " कार " हा एक शब्द. " कार " ह्मणजे कामें.

" टीप ५५ प्रश्नचिन्ह काढावें. कारण अर्थ तोच.

" १५ गर्दशी—आपत्ति, संकट.

" टीप ५८ " आग्लाब " बद्दल " अल्काब " असावें. अल्काब ह्मणजे पदवी.

६० २० जुवामर्द=पराक्रमी.

" २४ " ह्मणार " बद्दल " मरणार " असें असावें. मरणार मेला ह्मणजे जो मरावयाचा होता तो मेला.

" २१ " माचाहेडी " नांवाचा एक बराच मोठा गांव आहे.

६१ २१ " कदुप " बद्दल " लादून" असें असेलसें वाटतें.

" टीप ६६ " तुमची हत्तींची लढाई " असें असावें. म्हणजे मोठ्या मोठ्यांची लढाई. तुह्मी व ते मोठमोठे लढणार. त्यांत आह्मीं अल्पांनीं काय जबाब द्यावा ? असा भाव.

६२ १२ श्वेत=सेतु, पूल, रीग.

६३ ७ उदी=पिराजवळ ऊद जाळून त्याचा आंगारा प्रासदार्थ घेतात ती.

पृष्ठ. ओळ.

६३ टीप ७१ उजळणी न झाली=कलंक निघाला नाहीं.

६४ ५ फारबस=परबस=परवश.

" २२ गांवखुद=जमीनदोस्त, मृत.

६५ टीप ८४ या वाक्याचा आमचे लक्षांत अर्थ येतो तो असा " पाराजीपंत आणि खंडोपंत उभयतां काम पहात होते. पण पाराजीपंत हा "असे" "नाहीं" ह्मणजे "होय" "नाहीं" इतकें म्हणण्या पुरताच अधिकारी होता. सर्व काम खंडोपंतच चालवीत होता.

६६ २ " भार बरदारी " याबद्दल " भारबरदारी " असा एक शब्द पाहिजे. भारबरदारी= भरून, लादून.

" १६ " जहाला " याबद्दल " जहाल " असें असावें. जहाल= प्रखर.

" " चलण=चलन=वर्तन.

" " घटी=लक्षणेनें नशा पिणें असा अर्थ घ्यावा. नशा—अमली पदार्थ.

६७ ६ " झकली " याबद्दल झक्‍ली असें असावें. झक्‍ली= स्वच्छंदी वृत्ति.

" २४ दर्जे=दर्द=भेद.

६९ टीप ८७ कुरणीस—गुढघे टेंकून सलाम करितात तो.

" २५ दामदस्त=वसूल वासलात.

" टीप ८९ " बारबाद " याबद्दल " बरबाद " असावें.

७० ३ " भोपे सबळ "-भोपा—देवाचा पूजारी. तो देवापेक्षांही सबळ; म्हणजे यजमानापेक्षां कारभाऱ्याचें महात्म्य जास्ती.

" १३ " गुजरा " बद्दल "गुजारा" असावें. गुजारा=निर्वाह.

पृष्ठ. ओळ.

७० २० "प्रति बाबासाहेबांस" याजबद्दल "प्रतिबाबासाहेब" असें असावें. व पुढें पूर्णविराम करावा. प्रतिबाबासाहेब म्हणजे बाबासाहेबांसारखे.

७० २४ "दरम्यानवाल्यांनीं" हा एक शब्द. दरम्यानवाला–मध्यस्थ.

७१ १० दरम्यानकित=दरम्यानकींत. दरम्यानकी=माध्यस्ती.

७१ १५ आदौ घटत असावें–पूर्वीच विचार करीत असावें.

,, २५ दामदस्त=समग्र.

,, टीप १० कायल=निरुपाय होऊन.

७४ १ बोहोदे=ओहदे-हुद्दे.

७६ ३ संदेशा=अंदेशा, संशय.

७७ २४ पेंढारीस्वार मरतो कशास? =पेंढारी जिवापासून लढतो कशास?

७८ ६ साहा=शहा, राजा.

७८ टीप २४ 'हजारों बाजारों' हें अनुकरणवाचक आहे. हजार बिजार, दगड बिगड अशा तऱ्हेचें

७९ १७ "खतला" बद्दल "खतम" पाहिजे. खतम–समाप्त.

,, १९ नेमावर हा गांव हांडयाजवळ आहे.

,, २० "सरगोणचा" याबद्दल "खरगोण" पाहिजे. खरगोण हा नेमाडांत एक गांव आहे.

,, २७ ढाणकास. ढाणक-महारासारखे एक नीच जातीचे लोक.

७९ टीप २१ तलब–पगार.

,, टीप ३१ तऱ्हा देणें=टाळा देणें, सोडून देणें.

८० १ खातरतसलीम–खातरतसल्ली=समाधान.

पृष्ठ. ओळ.

८० ४ "सरगोणचे" बद्दल "खरगोणचे" असावें.

,, ८ मावशीबाई–अहल्याबाईची मावशी. महेश्वरीं रहात असे.

,, ९ "जावडाचावडी" बद्दल "नावडातावडी" असावें. नावडातावडी हा गांव महेश्वराजवळ आहे.

,, १७ "दुसारा" बद्दल "दुसरा" पाहिजे.

,, २० "समेरूढचा" बद्दल "शेमरूढचा" असें असावें.

८० २५ भांडींबरतन=(भांडीं+बरतन) भांडेंकुंडें.

८१ १ अडीरात देऊन=आडी रात देऊन=त्या कृत्यास सर्व रात्र आडवी देऊन, अर्थात् खर्चून.

,, १७ "सुजपालपूर" बद्दल "सुजालपूर" असें असावें. हें गांव माळव्यांत प्रसिद्ध आहे.

,, १७ "अष्टें" बद्दल "अष्टा" असें असावें. हा एक गांव आहे.

,, २० "समेरूड" बद्दल "शेमरूड" असावें.

,, २७ "केसुवाहूर" हें एका गांवाचें नांव आहे.

,, २८ खव=पेंव.

,, टीप ४१ रहबार=बोलणें.

८२ ३० पेगाम=निरोप.

८३ १६ "अबरूतलम"=बद्दल "अबरूतलब" असावें. अबरूतलब"=अब्रूची इच्छा करणारा, अब्रूची चाड ज्यास.

८३ ११-१७ दराबी=तोफेखालचा फडथैऱ्या (stand.)

,, १७ रसा=दोरखंड.

,, १८ "असल्यास" बद्दल "आसपास" असें असावेंसें वाटतें.

८४ १२ खतम=समाप्त.

पृष्ठ. ओळ.

८५ ११ ग्यारमाही=अकरामाही (पगार.)

,, १६ खाळ=ओढा.

,, २७ "करवन्या" याबद्दल "करवल्या" असें पाहिजे. करवली–घोड्यांवर बसून घोडेस्वार बोथाटी खेळणें, भाला मारणें, वगैरे जें करतब करितात ती.

८६ २१ चमेली-चंबल नदी. हीस चर्मण्वती असेंही नांव आहे.

८८ टीप ५१ मक्सद-कारण, हेतु.

,, ८ आसान-उपकार.

,, १४ "खासरोद" बद्दल "खाचरोद" असावें.

,, ,, "रतलाव" बद्दल "रतलाम" असावें.

८९ २१ बदखलींत-खळग्यांत.

९० २८ "सिउर" बद्दल "शिहूर" असें असावें.

९१ २८ अनीना=घोड्याच्या लगामा.

,, टीप ६७ कायल होणें=विरमून जाणें.

९६ ११ "जावत्याबरोबर नाहींत" याबद्दल "जावता बरोबर नाहीं" असें असावें. जावता=रक्षणाची सामग्री.

,, १६ "चालचीवर" बद्दल "लालचीवर" असावेंसें वाटतें.

९७ ८ "गालव" बद्दल "गालिब" असावें गालिब म्हणजे व्यास; अर्थात् मसलत आंगा-आली, मसलत करणें प्राप्त झालें असा भाव.

९७ टीप ७५ काटून=कापून.

,, १८ गुमराई=गर्व

९८ १० अंतूरचे घाटें–हल्लीं या घाटास आवऱ्याचा घाट म्हणतात.

,, ,, चर्मवती=चर्मण्वती, चम्मल, चंबल.

९९ ५ "सावर" बद्दल "साबर" पाहिजे.

पृष्ठ. ओळ.

९९ ७ "बुंदख" बद्दल "बंदूख" असावें.

९९ १० "शिकरी" बद्दल "शिप्री" असावें.

१०० २४ जाल=कपट, मायिक चिन्ह.

,, २५ "तवूर" बद्दल "तंबूर" असावें तंबूर म्हणजे नगारा.

१०१ २५ सोहलत=सुलभता, फुरसत, मोकळीक.

१०२ टीप २१ बरोबर आहे.

१०३ १० पुरकस=पूर्णपणें.

१०४ टीप ५ धाटा=दाढीवरून बांधण्याचा रुमाल.

१०५ २ शामखोर–हरामखोराचे उलट, इमानी.

१०५ १७ खासबरदार–खुद्द राजाची बंदूक वगैरे शस्त्रें बाळगणारा.

,, २१ तीन पांच–"बयाद" या अर्थी.

१०६ ४–५ सेखावाटीहरयाणा–दिल्ली जवळ गांव आहे.

१०७ टीप २६ अफलातून=बेफाम.

१०८ १० "बाराट" याबद्दल "बरोट" असावें. बरोट ही एक भाटांची जात आहे.

,, ,, जानबत्तीस=जॉन बॅप्टिस.

१०८ २४ लाचार या शब्दापुढील प्रश्नविराम काढून तेथें पूर्णविराम घालावा.

१०९ टीप ३१ गालब=गालिब-व्यास.

,, टीप ३३ हमरहा=पक्ष घेणें

११० ११ नर-तबेला–घोड्यांची पागा. ह्या पागेंत घोडी मुळींच नसते.

११० ३० बरायमसलत=संमतीच्या विचारानें.

१११ ७ भिमाबाई–ही यशवंतरावाची मुलगी.

११२ १९ "निवाहेडा" याबद्दल "निंबाहेडा" असावें. या नांवाचा एक कसब्याचा गांव आहे.

११३ टीप ४५ तात्या जोग–विठ्ठल महादेव

पृष्ठ. ओळ.

यांचेंच नांव तात्या जोग होतें. हे हल्लींचे किंवे त्यांचे पूर्वज [ पण जोग ह्या आडनावांचे कऱ्हाडयांत कोणी असल्याचें ऐकिवांत नाहीं. ]

१११ टीप ४६ कार=व्यवस्था.

११४ १२ फैल=कुभांड.

,, २१ गांगूरोणी=गांगरोणी-ह्या नांवाचा एक गांव आहे.

११५ ४ तरकीब-युक्ति, तोडजोड.

,, ८ टांका=खंडणी.

,, ८ "गाबावा" याबद्दल "गाबागुबा" असावेंसें वाटतें. गाबागुबा=किरकोळ खर्च-हा रांगडी शब्द आहे.

,, टीप ५० कायल=कुंठित, फजीत.

११७ ६ भीतरपेटे-आंतून.

,, १० "उर्ग" बद्दल "ऊर्फ" असावें.

,, १९ रवाब=दरारा.

११८ ७ "निबोहडा" बद्दल "निबाहेडा" असावें.

,, ११ मातेसरीस-मातेसरी म्हणजे मातुश्री-म्हसरोडगडास एक देवीचें प्रसिद्ध स्थान आहे ती

११८ २१ फोडा=अडचण.

११९ १४ 'कपूरखां' असें 'गफूरखां' यास कधीं कधीं म्हणत.

,, २५ "सतल" बद्दल "सजल" असें पाहिजे. सजल=मेळमाळ.

,, २६ "गंगसडचे" बद्दल "गंगराडचे" असें पाहिजे

१२० टीप ६६ "टाळा" च पाहिजे. टाळा=गुंगारा.

१२१ टीप ६९ "भालवणीची" बद्दल "भलावणीची" असेंच पाहिजे.

१२२ टीप ७३ हा "दसन" साहेब "डेविडसन" असावा.

१२३ टीप ३ नरवर हें प्रसिद्ध शहर आहे.

पृष्ठ. ओळ.

,, ११ रफीक=दोस्त, मित्र, हिताचिंतक.

१२४ १० 'शकल' या शब्दाचा अर्थ येथें चर्या, मुद्रा असा धरला आहेसें दिसतें.

१२५ २-हुजुरात-हुजरात पागा म्हणून एक रिसाला अद्यापि होळकरांच्या पदरीं आहे. हुजुरात पागेच्या घोड्यांचा खर्च सर्व कचा सरकारांत पडतो. इतर रिसाल्यांच्या घोड्यांचा खर्च स्वारांच्या पगारांतच असतो.

,, ३-अमेट-ह्या नांवाचें एक गांव असोन तेथे किल्लाही आहे.

,, ४-हत्तीचें निशाण-राजचिन्हाचें जें फौजेचें निशाण तें फौजेंत व स्वारींत हत्तीवर सर्वांच्यापुढें चालतें.

,, ३१-समेटलें—गोळा केलें.

१२६ ४-मार्गशीर्ष १४—शुक्ल कीं, कृष्ण ?

,, ५-सितामहू-सितामहू नांवाचें एक लहानसें रजपुतांचें संस्थान आहे. मंदोसरापासून ७-८ कोसांवर आहे.

,, ६-प्रतापगड-हेंही एक रजपुतांचें लहानसें राज्य आहे.

,, ७-मलकण साहेब=मालकमसाहेब.

,, १३-अमलफैल्ला-अम्मलदारी, सत्ता.

,, १४-मीरखां व कपूरखां=अमीरखां आणि गफूरखां.

१२७ १-असेरी-बऱ्हाणपुराजवळचा किल्ला.

,, ११-दौलत-(लक्ष्मी) राज्य. बरबाद=नष्ट.

,, टीप ९८-कबज-नोकर लोकांस खर्चास किती दिलें, नोकरीचे रुपये किती झाले व बाकी देणें

